Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 584 – 590

DOI: 10.5281/zenodo.10258878

Original Research Article

# महात्मा गांधीच्या विचाराचा सारसंग्रह

प्रा. डॉ. गोविंद राजाराम परडे

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शरदचंद्र महाविद्यालय, नायगांव बा. ता.नायगांव जि. नंदेड ४३१७०९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: goraparde@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 27 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावणा**

आज आपण वर्तमान पत्रात कुठल्या न कुठल्या चळवळीच्या बडयांच्या बातम्या वाचतो, त्यानिमित्याने होणारी जाळपोळ, मोडतोड, घातपात या गोष्टी तर आता नित्य परिचयाच्या झाल्या आहेत आणि त्यात आजचा तरुण आघाडीवर आहे आजच्या तरुणाला आपल्याभोवती सर्वत्र स्वार्थ हाव आणि सत्ता लोलूपता दिसत आहे. भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला आहे. बेकारीने थैमान घातले आहे राजकारणची पातळी डासाळली आहे. तेव्हा या तरुणाईपुढे आदर्श तो काय असणार पण अशावेळी तिव्रतेने आठवण येते बापूजीची (महात्मा गांधीची) त्यांचे त्यागी निस्वार्थी जिवन चरित्र स्फुर्तीदायक ठरेल.

बापुजी महात्मा कसे झाले यांचा शोध घेतला की त्यांच्या चरित्रातील दिव्यत्व जानवते ते तुमच्या आमच्या सारखेच सामान्य होते. सामान्यातुनच त्यांनी जे असामान्यत मिळवले ते अलौकीक आहे.

आपली जिवन कहाणी सांगताना ते तिचा उल्लेख सत्यांचे प्रयोग म्हणुन करतात त्यांनी आपल्या जीवनात अनेक प्रयोग केले ते करताना जेथे जेथे चुकले तेथे तेथे त्यांनी आपल्या चुकीची कबुली दिली हरीचंद्र नाटकाचा आपल्यावर परिणाम झाला हे सांगणारे बापू लहानपणी चोरुन बिडया ओडत होते हे ही प्रामाणिकपणे कबुल करतात. बापुजीने आयुष्यभर सत्य, अहिंसा या वृत्ताचे पालन केले त्यांच्या जवळ असामान्य धाडस होते. परदेशात असताना ते स्वत: धुवून कपडे वापरत असत आपल्या देशातील लोकाना अंगभर कपडे जोपर्यत मिळणार नाहीत तोपर्यत मी कपडे घालणार नाही अशी शपथ घेतली आणि आयुष्यभर पंचा घालूनच राहीले

बापुजीनी कार्य करताना आपला देश आपली माणसे लक्षात घेतली म्हणुनच सशस्त्र सरकारला आव्हान दिले ते निशस्त्र हातानी सत्याग्रह या नवीन अस्त्राचा उपयोग त्यांनी प्रथम आफ्रिकेत नंतर भारतात केला. 1920 ची अहसहकार चळवळ, 1930 वी दांडी यात्रा आणि 1942 चा चलेजाव लढा या सा-या विश्वातील स्वंतत्र लढयात अनुमाप आहे.

बापूजीच्या महानतेचे -हस्य त्यांच्या धवल चरित्रात आहे त्यांच्या जवळ फार मोठा संयम होता. एकदा त्यांची पत्नी कस्तुबा गांधी यांना डॉक्टरानी मीठ सोडवयास सांगितले तेव्हा त्या तयार नव्हत्या त्यावेळी बापूजीनी त्यांचे मनोबल तयार करणेसाठी स्वत:च मीठ सोडले आणि खजुर व शेळीचे या पदार्थावर अखेरपर्यंत राहीले. सत्ता संपत्ती यांच्या विणाशक स्पर्धेत कधीच अडकले नाहीत आफ्रिका सोडताना मिळालेल्या सर्व भेट वस्तु त्यांनी देश वासीयासाठी आर्पण केल्या. देशाच्या स्वातंत्र प्राप्ती नंतर ते सत्तेच्या कुठल्याच पदावर राहिले नाहीत तर निर्वासिताच्या सेवेला गेले त्यांचे स्वत:चे हस्ताक्षर फारशे चांगले नव्हते तरीपण वाईट हस्ताक्षर हे अपुर्ण शिक्षणाचे द्योतक आहे असा संदेश त्यांनी विद्यार्थ्याना दिला

**भारतीय अर्थविचारांमध्ये गांधीचे स्थान**

गांधीजी अर्थशास्त्रज्ञ नव्हते, किंवा त्यांनी अर्थशास्त्रविषयक स्वतंत्र ग्रंथही लिहिला नाही. तथापि त्यांनी धर्म, राजकारण किंवा एकुणच जीवनाचे जे तत्वज्ञान मांडले त्यातच त्यांचे आर्थिक विचार विखुरलेले आढळतात त्यांना एकत्रित करण्याचे काम त्यांच्या विविध अनुयायानी केले, ज्यामध्ये डॉ.कुमारप्पांचा उल्लेख विशेषत्वाने करायला हवा. आज आपण गांधीवादी अर्थशास्त्राची चर्चा करीत असलो तरी यात-हेचा काही प्रकार आहे हे गांधीजीना मान्य नव्हते. कारण त्यांच्या दृष्टीने अर्थशास्त्र हे वेगळे नसून जीवनाच्या क्रमाचा व तत्वज्ञानाचाच एक भाग आहे . अर्थशास्त्र आणि नीती यांची फारकत करणे त्यांना मान्य नव्हते किंबहूना, नैतिक विचारांचा प्रभाव आर्थिक जीवनावर असायलाच हवा. पाश्चिमात्य प्रणालीतील भौतिकवादाचा अतिरेक अयोग्य असुन गांधीजीच्या दृष्टीने व्यावहारिक शास्त्राला नैतिकमूल्यांची जोड दिल्याशिवाय व्यक्तीचे व राष्ट्राचे कल्याण होऊ शकत नाही.

**महात्मा गांधीचीवरील प्रभाव**

महात्मा गांधीजी स्वत: असे म्हणत असत की, त्यांचे स्वत:चे वेगळे अर्थशास्त्र नाही. त्यांच्यावर जर काही विचारवंताचा प्रभाव पडला असेल तर ते विचारवंत अर्थशास्त्रज्ञ नव्हते. ते थोरो, टॉलस्टॉय, जॉन रस्किन, ना.गोखले, भगवद्गीता, उपनिषदे तसेच संत कबीर, मीराबाई, गुरुनानक यांच्यासारख्या संतांनी त्यांना प्रभावित केले होते. राजकीय क्षेत्रात त्यांनी नामदार न्या.गोखलेना आपले गुरु मानले होते. या विचाराने महात्मा गांधीचे जीवनविषयक तत्तज्ञान हे विविध प्रभावांचे अद्वितीय मिश्रण ठरले.

**शारीरिक व बौध्दिक श्रमाला सारखे महत्व**

गांधीजीच्या मते, मानवाला दैनंदिन जीवन जगतांना बौध्दिक श्रमांप्रमाणेच शारीरिक श्रमाची आवश्यकता असते. शारीरिक श्रमामुळे आरोग्य निरोगी राहते.म्हणुन प्रत्येक व्यक्तीने श्रम केलेच पाहिजे. ‘ना श्रम, ना भोजन’ या उक्तीप्रमाणे

गांधीजीनी श्रम करणा-यालाच भोजन करण्याचा अधिकार असावा असे विचार मांडले. तसेच श्रम करणा-यालाच मतदानाचा अधिकार देण्यात यावा असे गांधीजीचे मत होते.

शारीरिक श्रम करणारा वर्ग समाजात नसेल तर सर्वत्र घाणीचे व दुर्गधीचे साम्राज्य निर्माण होईल. त्याचा विपरित परिणाम आरोग्यावर होणार म्हणुन शारीरिक श्रम करणा-याला कमी लेखू नये, श्रम मग ते शारीरिक असो वा बौध्दिक त्यांना समान महत्व दिले पाहिजे. तसेच समान कामासाठी समान वेतन द्यावयास हवे असा विचार गांधीजीनी मांडला.

**ग्रामस्वराज्य**

भारत देश हा खेडीप्रधान देश आहे. भारताचा विकास हाच भारतातील खेडयांचा विकासावर अवलंबुन आहे. खेडी विकासीत तर भारत विकसित असे गांधीजीचे मत होते. खेडी समृध्द झाली म्हणजे, देश आपोआपच समृध्द होतो. खेडयाचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे असे गांधीजीचे स्वप्न होते.त्यासांठी काय, कसे आणि कोठे करावयाचे यासंबधीचे देखील बरीचसी माहिती सांगितली प्राचाीन काळात भारतातील खेडी स्वंय पुर्ण व स्वावलंबी होती. उत्पादन, विभाजन व उपभोग हया तीन्ही गोष्टी खेडयाच्या पातळीवर एकाचा वेळी घडत असत. एक खेडी दुस-या खेडयावर अवलंबून राहत नसत. परंतु आधुनिक काळात खेडयाचे चित्र संपूर्ण बदलून गले. खेडयाची स्वयंपुर्तता पुर्णपणे नष्ठ झाली व शहरावर अवलंबून राहु लागली. शेतीमधील कच्चा पुर्णपणे नष्ठ झाली व  शहरावर अवलंबुन राहु लागली. शेतीमधील कच्चा मालाचे उत्पादन करण्याचेच कार्य खेडयाच्या हातात राहिले व पक्कामाल तयार करण्याचे काम मात्र शहरे करु लागले. तोच पक्का माल अधिक किंमतीला खरेदी करण्याची वेळ मात्र खेडयातील लोकांवर आली. शहरे अधिक किंमती आकारुन खेडयातील पैसा, संपत्ती, आपल्याकडे खेचून घेवून लागली यातून खेडयाचे शोषण होत गेले. लोकांचे उत्पन्न कमी झाले. खेडयातील जनता बेकारी. दारिद्रय उपासमार अशा समस्यांच्या विखळयात सापडली.

वरील प्रकारच्या समस्यांच्या विळख्यातुन खेडयातील जनतेला सोडावयाचे असेल तर भारतातील खेडयांचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे असा विश्वास गांधीजने व्यक्त केला.  कृषी संपन्न झाली पाहिजे. उद्योग विकेद्रीत झाले पाहिजेत सहकारी संघटना प्रभावीपणे काम केल्या पाहिजेत. भारतातील प्रत्येक खेडी आदर्श बनली पाहिजे. प्रत्येक खेडी, प्रजासत्ताक बनली पाहिजेत. महत्वाच्या गरजांच्या बाबतीत भारतातील प्रत्येक खेडी स्वंयपुर्ण व स्वालंबी बनली पाहिजे तरच भारताचा कायापालअ होऊ शकेल अन्यथा नाही.

स्वयंपुर्ण या संकल्पनेत गांधीजींना पुढील बाबी अपेक्षित होत्या. ग्रामरचना निटनेट की असावी, शाळा, धर्मशाळा, दवाखाना, प्रार्थना स्थळे, सार्वजनिक हॉल, सार्वजनिक नाट्यगृह, करमणुकीच्या सोयी, खेळाचे मैदान जनावरासाठी राखीव व्यवस्था असावी. मुलभूत शिक्षण आवश्यक करा सर्व उपकृम सरकारी पद्धतीने चालवावीत. पंचायतीने लोकशाही पद्धतीन खेड्याचे शासन चालवावे. अन्नधान्याचे उत्पादन घ्यावे. तंबाखू व अफुची पिके घेवू नयेत. खेड्यातील रेस्ते स्वच्छ असावीत. नाल्याची व्यवस्था असावी, पिण्याच्या पाण्याची, दिवा बत्तीची व्यवस्था असावी. खेड्याचे रक्षण खेड्यानीच करावे. अन्न, वस्त्र, निवारा या बाबतीत खेडी स्वयंपुर्ण व समृद्ध असावीत. फळाची झाडे असावित ग्रामपंचायतीत कायदे

करण्याचे त्यांची अंमलबजावणी जव न्यायदान करण्याचे अधिकार असावेत. जाती व्यवस्था नसावी, व्यवहार सहकारी तत्वानुसार व्हावा, अहिंसा पुर्ण सत्यगृह व असहकार हे एकमेव जनतेचे शस्त्र राहिल. या सर्व सुविधा पुरवुन खेड्याचे पुनरुज्जीवन करावयाचे असेल तर शिक्षण, आहर, आरोग्य व दारिद्र्य या संबंधीचे प्रश्न अगोदर सोडवावे लागेल असे गांधीजींचे प्रतिपादन केले.

ग्रामस्वराज्या संबंधी अशा प्रकारचे मत तत्कालीन परिस्थिती मध्ये गांधीजीने मांडले असले तरी आज मितीला देखील तेच होणे आवश्यक आहे.

परंतु वरील सर्व सुविधांच्या बाबतीमध्ये बरीचशी असुविधा दिसून येते. ग्राम स्वराज्य व वास्तविकता यामध्ये बरेच अंतर असल्याचे पाहावयास मिळते. गांधीजींचे जे स्वप्न होते ते अपूरेच राहून गेले व भविष्यात देखील असेच राहिल की काय याची भिती वाटते. थोडे फार प्रयत्न चालु आहेत. परंतु ते देखील अपुरे पडत आहेत असे म्हंटले तर चुक ठरणार नाही.

**विश्वस्ताची कल्पना**

विश्वस्ताची कल्पना मांडून गांधीजीने भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक समता कशा प्रकारे निर्माण करता येते हे सांगितले आहे. देशाचा विकास हा आर्थिक समतेवर आधारित आहे. विश्वस्ताची कल्पना म्हणजे अहिंसक मार्गाने देशात आर्थिक समता प्रस्थापित करणे होय. भांडवलशाहीच्या वाढीबरोबर भांडवलदार, उद्योजक, व्यापारी, जमीनदार यांच्या संपत्तीमध्ये वाढ होत होती व श्रमिका सारख्या घटकांचे उत्पन्न मात्र वाढत नव्हते परंतू हे सर्व एकाच देशाचे घटक आहेत. या सर्वांचे उत्पन्न सारख्या प्रमाणात वाढले पाहिजे व वाढत्या संपत्तीचा फायदा केवळ मोठ्या वर्गानाच न मिळता गरीबांना देखील मिळाला पाहीजे ज्यांचे उत्पन्न अधिक असेल अशा व्यक्तीना आपणास खर्च करण्यासाठी जेवढे उत्पन्न लागले तेवढे ठेवून घेतले पाहीजे. व बाकीचे सर्व उत्पन्न गरीबांच्या कल्याणसाठी हितासाठी खर्च केले पाहिजे असे गांधीजींचे मत होते. या संदर्भात त्यांनी आधी केले मग सांगितले. विश्वस्ताचे तत्व जगाला सांगण्याच्या अगोदर ते दक्षिण आफ्रिकेमध्ये असताना आपल्या सर्व मिळकतीचा विश्वस्त निधी तयार केला होता याच आधारे देशातील श्रीमंताना समाजाचे विश्वस्त बनन्याचे आव्हान करीत होते. त्या आव्हानाला त्या काळात प्रतिसाद देखील मिळाला होता. सर्व देशामध्ये अद्वितीय असलेली अहमदाबादची मजूर महान संस्था म्हणजे या दृष्टीने टाकलेले एक महत्वाचे पाऊल होते. गांधीजींच्या आव्हानानुसार श्री. जमनालाल बजाज यांनी "जमनालाल सेवा ट्रस्ट," वर्धा या नावाने विश्वस्त निधी निर्माण केला व ते त्या ट्रस्टचे पहिले विश्वस्त झाले. गांधीजी त्यांना व्यापारी राजपुत्र असे म्हणत असत.

अशा प्रकारच्या विश्वतांनी व्यक्तीसाठी नाही तर समाजवादी उत्पादन केले पाहीजे. समाज जेवढी संपत्ती बाळगण्याला मुभा देईल त्यापेक्षा अधिकसंपत्ती व्यक्तीनी बाळगू नये. या कज्पनेतून मालक वर्गाला सुधारण्यासाठी एक प्रकारची दिलेली संधीच होय. मानवी स्वभाव सुधा डिग्री शकतो यावर ही कल्पना आधारित आहे. एक वर्गविहीत समाजाची निर्मीती करणे हे या कल्पनेच्या पाठीमागचा गांधीजीचा उद्देश होता. विश्वस्त म्हणजे राष्ट्रीयी करणाच्या अहिंसक पर्यायच आहे. असे जरी म्हंटले तरी चुक ठरणार नाही.

वरील प्रकारच्या अपेक्षा विश्वस्त या कल्पनेत गांधीजींनी मांडल्या व वास्तवात आणण्याचा देखील प्रयत्न केला याच धर्तीवर आज देखील बरेचसे ट्रस्ट आहेत पण कार्य करण्याची पद्धती मात्र वेगळी दिसून येते. सध्याच्या काळात गाधीजींनी अपेक्षित असलेली विश्वस्त निर्माण होणे अवघड काम आहे. कारण हे विश्वस्त निधी निर्माण करता त्यांच्यात स्वतःचा निधीच नसतो तो सर्व निधी दुसऱ्याकडुन मागून गोळा केलेला असतो असे चित्र दिसून येते. समाजसेवेसाठी विश्वस्त निधी हा उद्देश असल्या ऐवजी आपल्या कुटुंबातील जेष्ठ व्यक्तीचे नाव अजरामर रहावे ह्या उद्देशाने जेष्ठ व्यक्तीच्या नावाने विश्वस्त निधी तयार केला जातो. गांधीजींच्या विश्वस्त व आजच्या समाजसेवीकांच्या विश्वस्तातील फरक.

चालू घडामोडीचा विचार करता जागतिकी करणाच्या प्रक्रियेत आहे त्या संस्था (विश्वस्त) टिकून राहतील किंवा नाही हे मात्र सांगता येत नाही व भविष्यात (विश्वस्त) निर्माण होतील किंवा नाही हे देखील सांगता येत नाही कारण जागतिकी करणाऱ्या प्रक्रियेतून भारतीय अर्थव्यवस्था खाजगीकरणाकडे म्हणजेच भांडवलशाहीकडे झुकते आहे. याचाच अर्थ विश्वस्त बदल अनिश्चिता निर्माण झाली आहे. ऐवढे मात्र स्पष्टपणे सांगता येते.

**लघुउद्योजकांना प्राधान्य**

गांधीजींनी भारताची लोकसंख्या विचारात घेऊन लघु उद्योगधंद्यांना प्राधान्य दिले. भारतीयांच्या हाताला काम मिळावे, त्यांचा विकास व्हावा, रिकामे डोके सैतानाचे घर बनू नये यासाठी त्यांनी घराघरातून व गावागावांतून कुटिरोद्योग व ग्रामोद्योग चालवावेत अशी अपेक्षा व्यक्त केली होती. कुटिरोद्योगांमुळे कुटुंबातील प्रश्न सुटण्यात मदत होईल तर ग्रामोद्योगांमुळे गाव स्वावलंबी व स्वयंपूर्ण बन शकेल अशी अपेक्षा गांधीजींनी व्यक्त केली होती.

**यांत्रिकीकरणाला विरोध**

महात्मा गांधीजींचा यांत्रिकीकरणाला विरोध होता. त्यामागचा उद्देश - १. भारताची लोकसंख्या विचारात घेऊन गांधीजींनी यांत्रिकीकरणाला विरोध केला. कारण मोठमोठ्या यंत्रांच्या साह्याने उत्पादन केल्यास भारतीय जनतेच्या हातात काम मिळणार नाही. निराश व हातश होणारी ही जनता नाराज असेल. बेकारी, दारिद्रय, विद्रोह निर्माण होण्याची शक्यता त्यामुळे नाकारता येऊ शकत नाही. म्हणून गांधीजींनी यांत्रिकीकरणाला विरोध केला. यंत्रामुळे व्यक्तीचे जीवन यंत्रमय बनते. मानवाच्या कलाकुसरीला व कौशल्याला महत्त्व उरत नाही. कौशल्यापासून तयार करण्यात आलेल्या वस्तूपासून मिळणारे मानसिक समाधान यंत्रापासून तयार होणाऱ्या वस्तूतून मिळू शकत नाही. म्हणूनच गांधीजींनी मोठ्या यंत्राला विरोध केला होता. शिलाई मशिन, चरखा यासारख्या छोट्या यंत्राला त्यांचा विरोध नव्हता.

**स्वदेशीला महत्त्व**

गांधीजींच्या मते, जनतेने स्वदेशीचा म्हणजेच आपल्या गावात व देशात तयार झालेल्या वस्तूंचा वापर करावा. त्यामुळे देशातील जनतेला काम मिळेल. बेकारी व दारिद्रय या समस्या नष्ट होण्यास मदत होईल. त्यामुळे गाव स्वावलंबी

व स्वयंपूर्ण बनू शकेल. तसेच स्वदेशी वस्तूच्या वापरामुळे देशातील चलन किंवा पैसा हा देशातच राहील. त्यासाठी स्वदेशी वस्तू महाग असली तरी तिचाच वापर करावा.

**वर्ग समन्वयाचे तत्त्व**

वर्ग कलहाची कल्पना त्यांना हिंसक वाटत होती. उलट प्रत्येक वर्गान दुसऱ्याचे कार्य व महत्त्व ओळखून समन्वय साधावा आणि परस्पर शोषण सोडून द्यावे असे त्यांचे मत होते. जुनी वर्णाश्रमाची कल्पना त्यांनी उचलून धरलो होतो. पिवृत्तीला प्राधान्य द्यावे परंतु इतर कोणताच धंदा व्यवसाय करणाऱ्यानी परस्परांना कनिष्ठ लेखू नये. वर्गयुद्ध हे भारताच्या मूळ प्रकृतीशी विसंगत आहे. आपल्याला जर अहिंसेचा संदेश कळला असेल तर भारतात वर्गयुद्ध अपरिहार्य नाही, ते टाळता येण्यासारखे आहे हे साज पटेल असे ते म्हणतात "वर्गकलहाच्या प्रश्नाला माझे उत्तर विश्वस्तपण आहे." असे त्यांनी सांगितले आहे.

**साधेपणा**

गाधीजींच्या मते समाजातील प्रत्येक व्यक्तीने साधे जीवन जगण्याचा प्रयत्न केला तर सर्व प्रश्न आपोआप सुटतील. साधी राहणी उच्च विचारसरणीचा पुरस्कार गांधींनी केला.स्वेच्छेने साधेपणा व समाधानीवृत्ती अंगी बाळगली पाहिजे. भौतिक गरजा वाढवत जाऊन मिळेल ते मिळवत जाण्याची हाव बाळगण्यापेक्षा इतरांना जे मिळत नाही ते आपल्यालाही नको अशी आत्मसंयमवृती जोपासणे हे व्यक्तीच्या जीवनाचे सूत्र होऊ शकेल. गांधीजींच्या मते, प्रत्येक व्यक्तीचे मन हे अस्वस्थ पदयासारखे असते, जास्त मिळवत असताना गरजा वाढत जातव व व्यक्ती असमाधानी राहते. सुखाची अवस्था प्रामुख्याने मानसिक अवस्था असते. प्रत्येक भारतीय माणसाने देशाची परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या गरजा कमी करायला शिकले पाहिजे, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सचोटी, माणिकपणा व संयम दाखवून आचार-प्रचारात सुसंगती ठेवली पाहिजे. थोडक्यात स्वातंत्र्य, समानता, विकास व सुखी मानवो जीवनासाठी विशिष्ट प्रकारच्या नैतिक व साध्या जीवनशैलीचा गांधींनी पुरस्कार केला.

**मानवी मूल्ये**

गांधीच्या अर्थशास्त्रात मानवी मूल्यातील बदल अपेक्षित आहे. त्यांनी पैसा आणि भौतिक संपत्तीपेक्षा नैतिक आणि मानवी मूल्यावर अधिक भर दिला आहे. त्यांच्या मते, मानवी जीवनाचा सर्वांगाने अभ्यास केला पाहिजे. गांधीजींच्या मते माणूस हा सर्वोच्य विचारवंत असून त्यांचे जीवन पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे

**समारोप**

गांधीजींच्या विचारांचे वर्णन थोडक्यात करायचे झाल्यास असे म्हणता येईल की ते आपल्या काळाच्या दोनशे वर्षे पुढे जन्मले होते. हे वाक्य विरोधाभासात्मक असूनही वास्तविक वर्णन करणारे आहे. "दोनशे वर्ष पुढे" या भागातून त्यांच्या विचारातील दूरदर्शीपणा आणि त्यांची अपरिहार्यता दिसून येते. "आपल्या काळाच्या या भागातून या विचारांची आजच्या परिस्थितीतील अव्यवहार्यता स्पष्ट होते. वेगळया शब्दात असेही म्हणता येईल की आजचे जग गांधीविचार स्वीकारण्याइतके परिपक्व झालेले नाही, पण शेवटी या विचारांना पर्याय नाही.

**संदर्भ सुची**

१. आर्थिक विचारांचा विकास, डॉ .विजय कविमंडन, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, 2009

२. आर्थिक विचारांचा इतिहास, डॉ.बी.डी.इंगळे अरुणा प्रकाशन लातुर, 2011

३. जागतिक आर्थिक विचाराचा इतिहास डॉ.एस.एम.खंदारे, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद

४. भारतीय राजकीय विचारक, रश्मी पाठक अर्जुन पब्लिक हाऊस नई दिल्ली, 2011

५. भारतीय राजकीय विचारवंत, प्रा. डॉ. शुंभागी राठी, कैलास पब्लिकेशन, औरगांबाद, 2016

६. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार,डॉ. एस. बी. चौगुले, नवज्योत अंक